ISSN 2319-8648

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

**Editor In Chief**

**Arun B. Godam**

Dec - 16 - (B)

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

International Research Journals Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief
**Mr. Arun B. Godam**

Vol I Issue IX, ( Half Yearly) Nov. 2016 To Apr. 2017

Editorial Office :

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

Contact :-

Arun B. Godam

8149668999, 8483959442

E-mail :

hitechresearch11@gmail.com.

Shaurya Publication,

Latur

Price : Rs. 250/-

EXECUTIVE EDITORS

Dr. Hanumant Mane
R Guide & Head, Dept of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist Osmanabad(M.S.)

Dr. N.J. Waghmare
Res. Guide & Head,Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P.)

Dr. U.T. Gaikwad
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

Dr U.V.Panchal
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Pro. S.B. Karande
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

Dr M.U. Yusuf
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

DEPUTY EDITORS

B.J. Hirve
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

S.M. Bansode
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud, Tq, Shahuwadi, Dist. Kolhapur

Maimanat Jahan Ara
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Dr. B.T. Lahane
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER

Half yearly Research Journal (4) Vol I Issue IX, Nov. 2016 ISSN : 231

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author | |
|---|---|---|---|
| 1 | Roots of Communal Conflict | Khan Qaiser Minhaj | |
| 2 | Dr. Babasaheb Ambedkar And Indian Economy | Gaikwad Rajesh Kachru | |
| 3 | Scenario of Water Scarcity in India | Sadiq Bagwan | |
| 4 | The Special Economic Zone Act (Policy) 2005 | Trupti Shivajirao Thorat | |
| 5 | A New Species Of Genus Hexacanalis Mohekari From Marine Water Fish, Trigon Sephen (Cuvier 1871.) | S.V. Kakade | |
| 6 | दलित चेतना की अभिव्यक्ति | प्रा. पवार ए.एस.<br>प्रा.डॉ. संजय गडपायले | |
| 7 | रहीम के काव्य में प्रेम की अनुभूति | डॉ. लीला श्रीकांत कर्वा | 2 |
| 8 | संत रविदास के काव्य में प्रगतिशील चेतना | गणपत श्रीपतराव माने | 3 |
| 9 | शोषणपरक राजनीति का अंत लोकनाट्य शैली में प्रस्तुती : खेला पोलमपुर | डॉ. के. बी. गंगणे | 3 |
| 10 | इक्कीसवी सदी का गद्य साहित्य: विशेष संदर्भ सूर्यबाला की कहानियाँ | डॉ. रत्नमाला धुळे (वानखडे) | 41 |
| 11 | हिंदी कथालोचना : नारी विमर्श के परिप्रेक्ष्य में | नागनाथ संभाजी वारले | 44 |
| 12 | स्त्री विमर्श | प्रो. नरसिंह आर्य | 46 |
| 13 | शुक्ल कृत 'मित्रता' में शिक्षापरकता | डॉ..बालाजी गायकवाड | 49 |
| 14 | महाराष्ट्र राज्यातील शालेय शिक्षणातील गळती-समस्या व उपाययोजना | डॉ. उदय श्रीकृष्ण काळे | 52 |
| 15 | विद्रोही कवि संत कबीर | राजकुमार थावरा राठोड | 55 |
| 16 | कृषि विपणनात बाजार समित्यांची भुमीका | डॉ.गोविंद राजाराम परडे | 60 |
| 17 | प्रमुख मृदा ( जमीन ) प्रकार व उपयोग | प्रा. लहाने बळीराम शिवाजी | 63 |
| 18 | बहामनी कालीन महाराष्ट्रातील सुफि संप्रदाय | प्रा. चव्हाण मारोती पोमा | 66 |
| 19 | सामाजिक न्यायाच्या राजकारणाचे वास्तववादी विश्लेषण | प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव | 68 |
| 20 | यु.म. पठाण यांची 'संशोधक व्यक्तीची' व्यक्तिचित्र | प्रा.डॉ. हनुमंत तुकाराम माने | 75 |
| 21 | राष्ट्रवादी कॉंग्रेसची विचारसरणी व राजकीय वाटचाल | प्रा.शिंदे एस.के. | 79 |

CURRENT GLOBAL REVIEWER ISSN - 2319- 8648
Half yearly Research Journal 68 Vol I Issue IX,Nov. 2016 To Apr. 2017

# सामाजिक न्यायाच्या राजकारणाचे वास्तववादी विश्लेषण

प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

19

Research Paper - Political Sci.

## प्रस्तावना :

१५ ऑगस्ट २०१६ रोजी दिल्लीच्या लालकिल्यावरुन देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सशक्त समाजाचा सामाजिक न्याय हा आधार असतो असे विधान केले. यावरुन सामाजिक न्यायाच्या राजकारणाचे वास्तववादी विश्लेषण करावे हा विचार मनात आला. मनात आलेल्या विचाराला कागदावर उतरवण्याच्या प्रयत्न म्हणजेच हा लेख होय. सामाजिक न्याय वर्तमान उत्तरआधुनिक समाज, राज्य व अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण व प्रगतशील संकल्पना आहे. या संकल्पनेने परंपरेनूसार चालत आलेल्या सामाजिक रुढी, परंपरा, अंधश्रध्दांना नष्ट करुन समताधिष्ठित, समरस व सर्वसमावेशक समाजाच्या स्थापनेचा मार्ग निश्चित केला. सामाजिक न्याय म्हणजे, एक अशी समाज व्यवस्था ज्यात कोणताही भेदभाव न करता प्रत्येकास समाजात समान संधी, सुख व सुविधा मिळाव्यात. जात, धर्म, लिंग, रंग, जन्मस्थान, वंश, गरिबी इत्यादीच्या आधारावर कोणालाही समाजात अपमानित होण्याची वेळ येवू नये. तसेच या आधारावर समाजातील कोणत्याही व्यक्तिच्या विकासात अडथळे निर्माण होवू नयेत. सामाजिक न्यायाचा विषय सामाजिक समता, समान संधी व सामाजिक अधिकाराशी संबंधित आहे. वास्तवतेत सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय परस्परांशी संबंधित आहेत. त्यामुळे ते परस्परांशिवाय पूर्ण होवू शकत नाहीत. सामाजिक न्याय या संकल्पनेतून सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचा अर्थबोध होतो. सामाजिक न्यायाचा संबंध मानवी मूल्य, आदर्श, अधिकार, प्रतिष्ठा व संधीशी आहे. ज्ञान हाच सद्गुण, दासोह, अनुभवमंटप, सर्वोदय, अंतोदय इ. विचारांना सामाजिक न्यायाचे प्रेरणास्त्रोत मानले जाते. संघटीत समाज जीवनातून मिळणारे सर्व फायदे काही मोजक्याच लोकांच्या हातात केंद्रीत नसावेत. तर आर्थिकदृष्ट्या कमकवुत व दुर्बल आहेत त्या सर्वांत वितरित करावे. जेणेकरुन ते ही सर्वांप्रमाणेच सुखी, सन्मानीत आणि निश्चित जीवन जगतील.

सामाजिक न्यायाचा विचार भारतासारख्या परंपरागत व रुढी परंपरांना मानणाज्या देशात अधिक प्रासंगिक आहे. कारण येथे अनादिकाळापासून जात, धर्म, वंश लिंग, रंग, व्यवसाय इ.च्या आधारावर भेदभाव अस्पृश्यता आणि श्रेश्ठ कनिष्ठत्वाची परंपरा आहे. सामाजिक न्यायाचा विचार या सर्वप्रकारच्या विषमता व भेदभावांना प्रखर विरोध करतो. या समाजातील दबलेल्या, उपेक्षित, वंचित व शोषत, पीडित व विकास प्रक्रियेच्या टोकावर असलेल्या लोकांना समाज व विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची सामाजिक-राजकीय चळवळआहे. वंचित समुदायाला

CURRENT GLOBAL REVIEWER ISSN - 2319- 8648
Half yearly Research Journal 69 Vol I Issue IX, Nov. 2016 To Apr. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

न्याय देण्याचा सामाजिक न्याय एक मार्ग आहे.

**संशोधन आराखडा :-**

सामाजिक न्याय हा भारतीय संविधान व राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. सामाजिक न्यायाच्या गोंडस नावाखाली सर्वच राजकीय पक्षांनी विविध क्षेत्रात कसे राजकारण केले यास सर्वांगिण बाजूने समजुन घेण्याच्या उद्देशाने हा लेख लिहिला आहे. भारतीय संविधानाचा आत्मा असलेल्या सामाजिक न्यायाची पायमल्ली सर्वच राजकीय पक्षांनी केली. या गृहितकास ग्राह्य धरुन चिंतन करण्यात आले. ते करताना ग्रंथालयीन व समिक्षणात्मक अभ्यासपध्दतीचा आधार घेतला आहे. सामाजिक न्यायाबाबतची संविधानकार, अभ्यासक, राज्यकर्ते व सर्वसामान्य माणसाची समज समजुन घेण्याइतपत या लेखाची उपयुक्तता आहे. या लेखात सामाजिक न्यायाशी संबंधित सर्वच घटकाबाबतीत विवेचन करण्यात आले. प्रस्तुत विषयाची निपक्षपातीपणाने मांडणी व्हावी यासाठी मुलभुत साहित्यासोबतच देगलूर महाविद्यालय देगलूरच्या ग्रंथालयात उपलब्ध पुस्तके, संदर्भ ग्रंथ व मासिकाचा आधार घेण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेतून सामाजिक न्यायास व्यावहारिक व सैध्दांतिक आधार देताना घटनाकार भारतीय परिस्थितीपासून अनभिज्ञ नव्हते. त्यामुळे त्यांनी संविधानातील अनेक कलम व प्रकरणातून सामाजिक न्याय स्थापनेच्या हेतूने तरतुद केली. उदा : उद्देशपत्रिका, मुलभुत अधिकार, मार्गदर्शक तत्वे ई. उद्देशपत्रिकेला अभ्यासकांनी राज्यघटनेचा आत्मा मानला. ज्यात स्पष्टपणे सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाच्या स्थापना करण्याचे अभिवचन आहे. घटनाकारांच्या मते, राज्यघटना सामाजिक, आर्थिक न्याय प्राप्तीसाठी कार्य करणारे यंत्र बनावे. सामाजिक, आर्थिक व राजकीय समताच सामाजिक-आर्थिक न्यायाचा आधार आहे. सामाजिक व आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर संधीची समानता व राजकीय समतेस कांही अर्थ नाही. त्यामुळे राज्यघटना आणि राजकीय नेतृत्वाने दलित, आदिवासी, मागास, अल्पसंख्यांक आणि महिला जे अनादीकाळापासून शोषित, पीडित आणि दमनग्रस्त आहेत त्यांना विभिन्न घटनाक्रम व प्रशासकीय तरतूदीतून संरक्षण दिले जावे. तसेच त्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी कांही विशेष तरतुदी केल्या जाव्यात. ज्यांना, सकारात्मक भेदभावाच्या माध्यमातून स्विकारले जावे. सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी राज्यघटनेतील तरतुदींना अनेक प्रकारे प्रभावित करता येते. सर्वांत प्रथम भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना, व्यक्तीची प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, समाजवाद, धर्मनिरपेक्षता इ. मूल्य तत्वांना प्राधान्य देते. मुलभूत अधिकारांतून नागरिकांच्या अधिकारासंबंधी भेदभाव विरहीत सिध्दांतातून स्पष्ट होते की, कायद्यासमोर सर्व लोक समान असतील. सर्वांना कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होईल. सर्वांना समान संधी आणि स्वातंत्र्य मिळेल. जात, लिंग, धर्म, सामाजिक प्रतिष्ठा इ.च्या आधारावर भेदभावाशिवाय राज्यघटना सर्वांना संधीची समानता देते. तसेच अस्पृश्यतेचे निर्मूलन करते. त्यांच्या अनुकरणास व पालनास एक दंडनीय अपराध मानला जातो.

मार्गदर्शक तत्वाद्वारे राज्ययघटना राज्याला निर्देश देते की, समाजातील असहाय्य वर्ग दलित व जनजातीच्या सामाजिक व आर्थिक हितास प्राधान्य द्यावे. सामाजिक भेदभाव व उपेक्षेचे शिकार झालेल्या वंचित समाजाला

समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाच्या धोरणाचा स्विकार करावा. कलम १५ (४) नुसार सामाजिक
व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गाच्या नागरिकांच्या विकासासाठी राज्याने व्यवस्था करावी. कलम १६ (४) नुसार
राज्याने मागासवर्गातील शासकीय नौकरीत जागा नसलेल्यांसाठी आरक्षणाची व्यवस्था करावी. भारतीय संविधानात
दलित व आदिवास्यांसाठी आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. ऑगस्ट १९९० मध्ये इतर मागासवर्गीयांसाठी
मंडल आयोगाच्या शिफारशींच्या आधारे २७% आरक्षण देण्यात आले. अशाप्रकारे शासकीय नौकरी आणि
शैक्षणिक संस्थानातील अर्ध्या जागा अनुसुचित जाती, जमाती व मागासवर्गांसाठी आरक्षित करण्यात आल्या.
दक्षिण भारतातील कांही राज्यात आरक्षणाची मर्यादा ७३% पर्यंत पोहोचली. राज्यघटनेतील कलम ३३० व ३३२
च्या माध्यमातून लोकसभा व राज्य विधानसभात अनुसुचित जाती व जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणता आरक्षणाच्या
जागा निश्चित झाल्या. याशिवाय अनुसुचित जाती व जमाती आयोगाचे गठन करण्यात आले. या वर्गातील
विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा दिल्या जातात. त्यांचे शोषण रोखण्यासाठी कडक कायदे बनवले. तरी होणारे शोषण
पाहून नरेंद्र मोदी म्हणतात दलितों की हत्या को सहन नहीं करेंगे उससे पहले मुझे गोली मार दो. सामाजिक सुरक्षेचे
अनेक कार्यक्रम बनवण्यात आले. केंद्रीय मंत्रीमंडळातही त्यांचे सहभागीत्व ठरवण्यात आले. महाराष्ट्रातून रामदास
आठवलेंना केंद्रात राज्यमंत्री म्हणून स्थान देण्यात आले. भारतीय राज्यघटना आणि राजकीय प्रशासकीय व्यवस्था,
दलित-आदिवासी यांच्या प्रगती व कल्याणासाठी अनेक तरतुदी आणि कार्यक्रम केले. जगातील इतर राज्यघटनेपेक्षा
हे आमचे वेगळेपण आहे. सामाजिक न्यायाप्रती भारत शासनाची प्रतिबध्दता मागास समुह व वर्गाच्या प्रगती व
कल्याणाची असल्यामुळे स्वतंत्र २ मंत्रालय बनवण्यात आले. अल्पसंख्यांच्या विकास व कल्याणासाठी अल्पसंख्यांक
कल्याण मंत्रालय, आदिवासींच्या विकासासाठी व कल्याणासाठी आदिवासी मंत्रालय, महिला व बालकांच्या
कल्याणासाठी महिला बाल विकास मंत्रालय आणि सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालयाची स्थापना करण्यात
आली. जे देशात सामाजिक न्यासासंबंधी कार्यक्रम व क्रियाकलापात समन्वय स्थापित करुन मार्गदर्शन करते.
भारत शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने २००८ साली जगातील सर्वांत मोठी रोजगार हमी योजना, मनरेगा
चालू केली. जी ग्रामीण भारतात सर्वांत मोठा रोजगार प्रदायक कार्यक्रम आहे. अशाप्रकारे भारत शासनाने ५ जूलै
२०१३ ला अध्यादेशाद्वारे अन्न सुरक्षा अधिनियम लागु केला. ज्यात देशातील ६७% जनतेला स्वस्त दराने अन्न
उपलब्ध करुन दिले. गरिबांना भुकबळी आणि कुपोषणापासून मुक्ती दिली. छत्तीसगढ, मध्यप्रदेश, तामिळनाडू,
ओरिसा, कर्नाटक या राज्यांनी अशाप्रकारच्या योजना पूर्वीच चालवल्या.

स्वातंत्र्यानंतरच्या शासनाने राज्यघटनेतील तरतूदींच्या चौकटीत राहून सामाजिक न्याय स्थापित करणे
आणि सर्वसमावेशक विकासासाठी अनेक कायदे व कार्यक्रम राबवले. राज्यघटनेच्या अंमलबजावणीस ६६ वर्षे
झाले आम्ही सामाजिक न्याय स्थापन करण्याच्या दिशेने कुठपर्यंत पोहोचलो ? सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न
कुठपर्यंत पूर्ण झाले? याबाबतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विधान आजही प्रासंगिक आहे. जे त्यांनी २५ नोव्हेंबर
१९४९ ला संविधान सभेला अंतिम वेळेस संबोधित करताना उद्‌गारले, सामाजिक स्तरावर भारत एक असा देश
आहे, जो विषमतावर आधारित आहे. ज्यात काही लोक प्रगतीच्या दिशेने तर कांही लोक ऱ्हासाच्या दिशेने अग्रेसर

ISSN - 2319-8648
Vol I Issue IX,Nov. 2016 To Apr. 2017

आहेत. आर्थिक क्षेत्रात कांही लोक अत्याधिक श्रीमंत आहेत तर अधिकांश लोक गरीबीने ग्रस्त आहेत. २६ जानेवारी १९५० ला आम्ही विरोधाभासाने युक्त जीवनात प्रवेश करत आहोत. राजकीय क्षेत्रात आम्ही सर्व समान आहोत. परंतु सामाजिक व आर्थिक क्षेत्रात विषमताच विषमता आहे. राजकारणा अंतर्गत प्रत्येक व्यक्तीला एक व्यक्ती एक मत एक मूल्य असेल परंतू सामाजिक-आर्थिक क्षेत्रात आम्ही एक मनुष्य एक मूल्याच्या सिध्दांताला अस्वीकार करु. आम्ही केंव्हापर्यंत विरोधाभासाच्या युगात जगणार ? सामाजिक व आर्थिक जीवनात केंव्हापर्यंत समतेला अमान्य करु ? जर आम्ही निरंतर असेच जीवन जगू तर आमची लोकशाही धोक्यात येईल. या विरोधाभासांना आम्ही लवकरात लवकर नष्ट नाही केले तर जे लोक विषमतापूर्ण जीवन जगत आहेत. ते राजकीय लोकशाहीला उडवून टाकतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ६६ वर्षांपूर्वी जी गोष्ट सांगितली ती आज भारतीय समाजासाठी सत्य आहे. सर्व घटनात्मक तरतूदी आणि शासनाच्या अनेक प्रयत्नांशिवाय दलित आणि आदिवासींच्या जीवनात अधिक सुधारणा जाणवत नाही. सातत्याने दलितांवरील शारिरीक व मानसिक अत्याचारात वाढ होत आहे. अशा वेळेस महाराष्ट्रातील प्रस्थापित वर्ग मराठा समाज ॲट्रासिटीचा कायदा नष्ट व्हावा म्हणून मोर्चे काढत आहे. ज्यास नष्ट करण्यासाठी नरेंद्र मोदींनी दलितांवर अत्याचार करण्याऐवजी माझ्यावर गोळ्या झाडा असे आवाहन करावे लागले.

स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर ही देशातील १/३ लोक दारिद्रय रेषेखाली जगत आहेत. ४२% महिला व बालके कुपोषणाचे शिकार आहेत. देशातील ८८% लोकसंख्या २० रुपये प्रतिदीनच्या उत्पन्नावर जगत आहे. देशाच्या ८०% साधनसंपत्तीवर २०% लोकांचे अधिपत्य आहे. देशात लाखो कुटूंब असे आहेत ज्यांचे घरी दोन वेळची चूल पेटत नाही. मानव विकास निर्देशांकात आम्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रीलंका, बांग्लादेश व पाकिस्तानपेक्षाही खाली आहेत. मागील ७० वर्षांत आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी वाढत आहेत. श्रीमंत अधिक श्रीमंत झालेत तर गरीबांची स्थिती अधिक बिकट होत आहे. आम्ही गरिबांचे दुष्टचक्र तोडण्यात अयशस्वी झालो. सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ रेगनर नर्क्सच्या मते-गरिब यामुळे गरिब आहे की, तो गरीब आहे. रेगनरचा सिध्दांत भारतास पूर्णतः लागू होतो. भारतात गरीबी निर्मूलनाचे सर्व कार्यक्रम व आश्वासन हवेत नष्ट झाले. मागील काही वर्षांत विकासाचे फार विशाल आश्वासन देण्यात आली. वाढत्या आर्थिक विकास दराचे बिगुल वाजवण्यात आले. विकास व समृध्दीचे मोहक चित्र प्रस्तुत करण्यात आले. परंतु वास्तव चित्र वेगळेच आहे. बिहार, उत्तरप्रदेशसह इतर काही राज्याकडे पाहता याची प्रचिती येते. या राज्याकडे पाहता विकास कोणता आणि कोणाचा होत आहे ? असा प्रश्न निर्माण होतो. सर्वसमावेशक विकास सामाजिक न्यायाचा आत्मा असतो. परंतू जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या युगातील स्वार्थात विकासाचे मार्ग बनत आहेत. असंतुलित विकासाचा मार्ग मग तो व्यक्तिगत स्तरावर असो अथवा प्रादेशिक स्तरावर तो सामाजिक न्यायाचा मार्ग असू शकत नाही. आज भारतात हीच प्रक्रिया राबत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक न्यायाच्या नावावर राजकारणच अधिक होते. वास्तवतेत काम कमी होते. भारतातील सर्व राजकीय पक्ष स्वतःला सामाजिक न्यायाचा रखवालदार व संरक्षक सिध्द करण्याच्या स्पर्धेत असतात. भारतीय राजकारणात सामाजिक न्यायाचे अनेक दूत मिळतील.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded